श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.



संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

# अनुक्रमणिका.

श्री साईंबाबा शिर्डी संस्थानचे व्यवस्थेची स्कीम.

## महाराजांचे अनुभव.

श्री साईंनाथ बाबा आर्यासप्तक. ५

रा. रा. विष्णु विनायक साटे यांनी केलेल्या कविता, ६

श्रीमती हिराबाई गायकवाड यांनी केलेली सुरस पद्यें. ७

सौमित्र विरचित श्री साईनाथ स्तोत्रम्. ९

## स्फुट प्रकरण.

श्री साई महाराजांची दुसरी पुण्यतिथी
रोजी श्री समाधी समोर म्हणण्यांत आलेली पद्यें ११

...स गणूकृत गुरुपाठाचे अभंगांतील उतारा १३

आतां पर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला १७

श्री साईसच्चरित. २३-४८

वर्गणी तीन रुपये. ट. हा. सह तीन रुपये सहा आणे, फुटकळ अंकास पांच आणे.

## पुस्तकाची पोंच व अभिप्राय.

"कैवल्य वैभव" या नांवाचें पद्यसंग्रहाचें पुस्तक त्याचे संग्राहक ...क रा. रा. रघुनाथ हणमंत कोटणीस, वकील, कुरुंदवाड यांज... ...सूचेकडे अभिप्रायार्थ आलें आहे. चिमड संप्रदायाची पंचपदी हा ...संग्रहाचा मूळ उद्देश आहे. यांत त्या संप्रदायाचा नित्य नियम ...देऊन नंतर संप्रदायांतील प्रसिद्ध पुरुष श्री रेवणसिद्ध महाराज ...कानडी पदें, नारायणराव भाऊसाहेब महाराज भिवरगीकर ...राव महाराज परगड्डीकर यांच्या पदांचा संग्रह केला आहे त्या नारायणराव भाऊसाहेब महाराजांची पदें बहुतेक कानडीत आहेत. ...राव महाराजांची पदें फार प्रेमळ आहेत. यानंतर महाराष्ट्रांतील ...संत मुकुंदराज महाराज, ज्ञानेश्वर महाराज, मुक्ताबाई, एकनाथ ...तुकाराम महाराज यांच्या व तसेंच कबीर महाराज, गोरखनाथ ...संतांच्या पद्यांतील निवडक वेंचे काढून ते निरनिराळ्या विषयां... ग्रथित केले आहेत. हा पद्य संग्रह प्रेमळ वाचकांस आनंद देईल ...का नाहीं. पुस्तकाची किंमत १। रु. ठेविली आहे. पुस्तकें मिळण्याचें ...कैवल्यवैभव आफिस हणमंतराव कोटनीस वकील सांगली यांचे ...मधील...

# श्रीसाई लीला.

( मासिक )

वर्ष १ लें. वैशाख शके १८४५. अंक २ रा.

## श्री साईबाबा शिर्डी संस्थानचे व्यवस्थेची स्कीम.

( अहमदनगर डिस्ट्रिक्ट कोर्टाकडून मंजूर झालेली )

१ संस्थानची सर्व स्थावर जंगम मिळकत खालील पांच ट्रस्टी यांचे हयातीपावेतों त्यांचे ताब्यांत राहील.

### ते पांच ट्रस्टी.

( १ ) मि० मोरेश्वर विश्वनाथ प्रधान बी० ए० एलएल बी० बॉंबे लेजीस्लेटिव्ह कौन्सीलचे मेंबर.

( २ ) मि० लक्ष्मण गणेश महाजनी मेसर्स शुरजी वल्लभदास आणि कंपनी व्यापारी मुंबई.

( ३ ) प्रोफेसर गणेश गोविंद नरके रसायन आणि भूगर्भ शास्त्राचे प्रोफेसर सायनस कॉलेज. पुणें.

( ४ ) मि० रामचंद्र आत्माराम तरखड म्यानेजर आणि सेक्रेटरी खटाव मकनजी मिल्स मुंबई.

( ५ ) तात्या गणपती पाटील कोते ल्यांड लॉर्ड शिर्डी.

या ट्रस्टींची एकादी जागा रिकामी झाल्यास त्याचे जागीं श्री साईबाबा यांचे भक्तांपैकीं एकादा इसम हल्लींच्या ट्रस्टींनी होतां होईल तितके लवकर मेहरबान डि० जज्ज साहेब यांचे मंजुरीनें नेमावा.

२ ह्या संस्थानची व त्याचे स्थावर जंगम मिळकतींची व्यवस्था शिर्डी संस्थान कमेटीकडे असावी. व ट्रस्टी हे ह्या कमेटीचे एक्स ऑफि-शिओ सभासद होतील.

शिर्डी संस्थान कमेटीमध्यें एकूण १५ पंधरा सभासदांचा समावेश असावा:-त्यांमध्यें ट्रस्टी;चेअरमन. (१) खजीनदार (१) सेक्रेटरी (१) मदतनीस खजीनदार आणि एक मदतनीस सेक्रेटरी, इतर असावेत. यांची नांवें येणेंप्रमाणें.

## कमेटी चेअरमन

ह. भ. प. गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे ऊर्फ दासगणु.

## खजीनदार.

मि० गोविंद रघुनाथ दाभोळकर

रिटायर्ड मामलेदार आणि रेसिडेंट फ० क्लास माजिस्ट्रेट बांद्रा.

## मदत खजीनदार[१].

मि० यशवंत जनार्दन गाळवणकर बी. ए.

न्यायखातें सेक्रेटारीयेट मुंबई.

## सेक्रेटरी.

मि० हरी सिताराम दीक्षित

रिटायर्ड सॉलीसिटर आणि हायकोर्ट वकील.

## मदत सेक्रेटरी.

रामचंद्र दादा कोते पाटील शिर्डी येथील जमिनदार.

## सभासद.

मि० कृष्णराव नारायण परूळकर. आनररी म्या. हर्डा सी. पी.

मि० गणेश दामोदर केळकर

रिटायर्ड सरकारी नोकर; हल्ली राहणार शिर्डी

मि० अमाईदास वी० मेहता

प्रोप्रायटर ब्रिटिश फोटो एनलार्जींग कंपनी काळबादेवी मुंबई

मि० माधवराव बळवंत देशपांडे जमीनदार राहणार शिर्डी.

---

१ हे हल्ली मयत असून यांचे जागी रा. रा. सखाराम बळवंत धमाधिकारी यांना नेमण्यांत आलें आहे.

मि. रघुवीर भास्कर पुरंदरे कारकून लोको डिपार्टमेंट जी.आय. पी. रेल्वे कंपनी मुंबई.

४ हे ट्रस्टी कायमचे काम करणारे राहतील या ट्रस्टीखेरीज वरील मंडळींनीं २ वर्षेपर्यंत कामें करावीत. त्यानंतर ट्रस्टीखेरीजकरून बाकीचे सर्व अधिकारी भक्तमंडळींनीं यापुढें निर्दिष्ट केलेल्या पद्धतीनें होतां होईल तितके लवकर भक्तमंडळ तयार करून त्यांतून निवडून घ्यावेत.

५ जे लोक भक्तमंडळांचे सभासद होण्याबद्दल अर्ज करतील व संस्थानचे खर्चाकरितां निदान वर्षाला पांच रुपये वर्गणी देण्यास कबूल होतील अशाच लोकांचा श्रीसाईबाबांचें देवळाचे भक्तमंडळांत समावेश होईल. कमेटीनें कांहीं विशेष लेखी कारणें नमूद केल्यास एकाद्याकडून वरीलप्रमाणें वर्गणी न घेतां अगर वर लिहिल्याप्रमाणें त्याचा अर्ज नसतां त्याजला सदरचे भक्तमंडळांपैकीं एक ऑनररी सभासद नेमण्याचा अधिकार आहे.

६ भक्तमंडळाच्या सभेंत कमींत कमी १० जणांची संख्या असावी, आणि शिर्डी संस्थान कमेटीचें सभेंत ५ जणांची संख्या असावी:—

७ शिर्डी संस्थानचे कमेटींत (जिला यापुढें थोडक्यांत म्हणजे कमेटी असें म्हटलें आहे.) मृत्युमुळें राजीनाम्यामुळें अगर अन्य कारणामुळें रिकामी जागा झाल्यास ती कमेटीनें भरावी.

८ जिला यापुढें मंडळ म्हटलें आहे. त्या कमेटीचीं मुख्य कामें खालीलप्रमाणें आहेत.

( A ) भक्तमंडळाच्या वेळोवेळींच्या सूचनेप्रमाणें हल्लीं चालू असल्याप्रमाणें संस्थानची व्यवस्था ठेवणें.

( B ) संस्थानची सर्व स्थावर व जंगम ( रोकड दस्तऐवज वगैरे ) सुरक्षीत ठेवणें. देणग्या वर्गणी गोळा करणें. भाडें व देणें घेणें, व इतर उत्पन्नाची वसुली करणें व संस्थाचे लोकांचा पगार देणें. व इतर खर्च करणें.

( C ) संस्थानांत आलेल्या सर्व वस्तू व रकमांसंबंधी योग्य व खरा जमाखर्चाचा हिशेब ठेवणें, व हिशेब तपासणी करणें. वार्षिक जमाखर्चाचा

तक्ता तयार करणें व तो भक्त मंडळापुढें वार्षीक सभेचेवेळीं ठेवून त्याची नक्कल मे० डि० जज्यसाहेब नगर यांजकडेस पाठविणें.

( D ) संस्थानसंबंधीं यात्रा व उत्सव भरविणें, पुराणीक, हरिदास, भजनी लोक, गायन करणारे, व भिक्षुक, यांची योग्य संभावना करणें.

( E ) संस्थानची शिल्लक जमिनी अगर इंडियन ट्रस्ट ॲाक्ट क० २० अन्वयें ज्या ठेवी असतील त्या योग्य तऱ्हेनें व्याजीं लावणें.

( F ) संस्थानची स्थावर जंगम मिळकत नीट आहे तशी ठेवणें.

९. कमेटीला डी॥०जज्ज साहेब बहादूर यांचे परवानगी शिवाय संस्थेची जवाहिराची अगर स्थावर मिळकतीची गैर विल्हेवाट करण्यास गहाण ठेवण्यास अगर स्थावर बोजा उत्पन्न करण्यास अधिकार नाहीं. तथापी संस्थेची एकादी जंगम मिळकत विकण्यास अगर ज्या जिनसा निरुपयोगी अगर विकतां येत नाहींत अशा असतील त्यांचा नाश करण्याचा अधिकार कमेटीस आहे. संस्थेची स्थावर मिळकत भाड्यानें देण्यास २ वर्षांपेक्षां ज्यास्त नाहीं, अशा मुदतीनें व योग्य त्या भाड्याबद्दल करारानें देण्यास अधिकार कमेटीस आहे.

१० कमेटीनें खालील बाबतींत स्कीमला धरून नवीन नियम होता होईल तितके लवकर करावे.

( अ ) भक्तमंडळ स्थापन करण्याकरितां.

( ब ) भक्त मंडळाची सभा भरविण्याकरितां आणि कमेटीची सभा भरविण्याकरितां.

( क ) कमेटीचें अंतर्व्यवस्थेचे बाबींत व लोकल सब् कमेटी स्थापन करण्यास.

( ड ) संस्थेची सर्व कामाची व्यवस्था करण्याकरितां.

११ कमेटीस जरूर लागल्यास आणि इष्ट दिसल्यास कोर्टाकडून सल्ला विचारणें झाल्यास त्या कोर्टाकडे अर्ज करण्यास मोकळीक कमेटीस आहे.

भगवद्भक्तिपरायण श्री० उद्धवेशबुवा उह्राणूकर यांचे आर्यासप्तक:-- यांतील प्रत्येक आर्येच्या आद्याक्षरांनी 'श्रीसाईनाथ बाबा' हें गोड नाव साधलें आहे:--

# ।। श्री साईनाथबाबा ।।

## आर्यासप्तक

श्री गुरुराया ताता, सांभाळी शामदास[1] हा तनय ॥
त्वत्पदिं ठेवुनि माथा, प्रार्थितसें प्राप्त हो मला विनय ॥ १ ॥
सांडून लोभमोहा, लावियलें सत्पथास या जन जे ॥
बाळा[2], गोविंद[2], हरी[3], बापू[5], श्रीकाशिनाथ[6] तुजशि भजे ॥ २ ॥
ईशा तव लीलेला, वर्णाया भक्तिपंथ गणु[7] लागे ॥
नच पूर्तता तयाला वर्णन करण्यास तोहि वा भागे ॥ ३ ॥
नानां[8] मार्गे जातां, दावियलें रूप विविध जातीचे ॥
पटलें ज्यांना नच त्या, बोधियलें सत्स्वरूप मग साचें ॥ ४ ॥
थट्टेनें, सत्यानें नाम तुझें नित्य घेति जे वदनीं ॥ ५ ॥
बालकरामा[9] धामा, हिंडविलें सत्य-देव, बघण्याला ॥
फिरफिरुनि श्रांत झाला, आला परतून शिर्डि[10] ग्रामाला ॥ ७ ॥
बाबा! अगाध लीला, वर्णायाउध्दवेश[11], वा थकला ॥
तन, मन, तुझेंचि धन हें. सर्व परीनें तुझ्या चऱ्हा-विकला ॥ ८ ॥
ऋषिसंख्या-या-आर्या[12] आयांचे चरण-कमलिं अर्पितसे ॥
~~असमंत असे हा~~ यति,-मात्रा, वृत्त बोध मजशि नसे ॥ ९ ॥
श्रीसाईनाथ चरणीं, अल्पहि करणी करीतसे हजर ॥
सर्वत्र दोष-त्यागुनि, बुध-जनि ठेवाच इजकडे नजर ॥ १० ॥

---

१ हेबुवा इ. स. १९०६ सालीं शिर्डीस गेल्यावेळीं श्रीसद्गुरूंनीं त्यांना शामदास म्हणून हाक मारली व पुढेंही याच नांवानें ते त्यांस संबोधीत. २ कै. बा. ग. रा. बाळा साहेब भाटे व बाळा साहेब देव मामलेदार हल्लीं वस्ती ठाणें. ३ अण्णासाहेब दाभोळकर. ४ काकासाहेब दीक्षित. ५ कै. श्री. बापुसाहेब बुटी. ६ श्री. उपासनी महाराज. ७ श्री दास गणु महाराज. ८ नानासाहेब निमोणकर नानासाहेब उर्फ नानासाहेब चांदोरकर, नानाबुवा. ९ कै. रा. ग. रा. बालकराम. १० शिर्डी. ११ बड्या बाबा उर्फ फकीर बाबा. १२ नमस्कार करणाऱ्याचें नांव. १३ ऋषिसंख्या
१ श्रीसाईनाथ बाबाहीं अक्षरें हीं

रा. रा. विनायक विष्णु साठे यांच्या खालील कविता श्री साई स्वरूप वर्णन असून उत्तम झाल्या आहेत हे जाणून त्यांस या मासिकांत स्थळ देण्यांत येत आहे.

( शालिनी )

आहे योगी शीरडी ग्रामवासी ।
साईबाबा ज्ञानवैराग्य राशी ॥
साक्षित्वानें लक्षितांना निवृत्ति ।
आनंदानें आदरी जो प्रवृत्ति ॥ १ ॥

( उपेन्द्रवज्रा )

असो प्रवृत्ती अथवा निवृत्ती ।
उदास राहे धरि मौनवृत्ति ॥
समान पाहे उभयांस योगी ।
निजात्मतेचा परिमोद भोगी ॥ २ ॥

( इन्द्रवज्रा )

भेदीं असावें अथवा अभेदीं ।
तो नित्य बोधा कधिंही न भेदी ॥
विश्वांत जो एकच तत्व पाहे ।
त्याचा समाधी सहजींच आहे ॥ ३ ॥

लीला जयाच्या उपदेश देती ।
धीमंत भावें स्वमनांत घेती ।
वाणीस कोणी म्हणती अभद्र ।
सूज्ञांस देते परि पूर्ण भद्र ॥ ४ ॥

( उपेन्द्रवज्रा )

उदास चित्तें व्यवहार सर्व ।
करोनि खंडी कळतांच, गर्व ॥
असे उदारा अति तीव्रबुद्धी ।
उदी जयांची करि देहशुद्धि ॥ ५ ॥

सूज्ञांस लाभे स्थिरता मनाची ।
भीती न त्यांची लवही जनाची ॥
ज्याचे मनीं भाव जसा असेल ।
[illegible] मिळेल ॥ ६ ॥

साई न दुःखा अथवा सुखाला ।
देई, न आदर्श जसा मुखाला ॥
सौंदर्य किंवा अतिहीन मुद्रा ।
चंद्रोदयें ये भरती समुद्रा ॥ ७ ॥

( वसंततिलका )

वाणींतुनी स्रवतसे सहजीं प्रबोध ।
लागे विचार करितां हृदयांत शोध ॥
मी कोण ! हें जग कसें उदयास येतें ।
राहे कुठें स्थिर ! कसें विलयास जातें ॥ ८ ॥
होसी सुकाव्यरसदायक साईराया ।
नाहीं कधींच शिवली तुज मोहमाया ॥
पीयूष-सागर असे उघडा जनांला ।
अत्यल्पबिंदु न मिळे कुटिला मनाला ॥ ९ ॥

( मन्दाक्रांता )

जेथें तेथें दिससि मजला सद्गुरो सिद्धसांई ।
नाहीं नाहीं तुजविण दुजी दृश्य भावास आई ।
अंबे घेई पदरिं तव हा बाळ लावी स्तनाला ॥
स्वानंदाचें मधुर पय दे, शांतवी ताप-जाला ॥ १० ॥

---

ता० सं० १९२१ च्या दोंगिमेंच्या दिवशीं समाधी समोर म्हटल्या गेलेल्या श्री साई-चरणांकित श्रीमती हिराबाई गायकवाड यांचीं सुरस पद्यें.

" पद. " ( दाखवी तव दिव्यपाय बा. चालीवर )

साई साई योगीराज । धांव पाव मातें ॥ धृ ॥ ० ॥
रंकहीन दासी तुझी । ध्याई त्वत्पदातें ॥ १ ॥
अंत किती पाहासी बा । वारी आपदातें ॥
अजामीळ पिंगळेसी । तारियेलें नाथें ॥ २ ॥
भंगवेन काय अहा । मदिय अघ नगातें ॥
देव गुरु साई दत्त । देई दर्शनातें ॥ ३ ॥
स्फूर्ती आणि प्रेम देई । तव कीर्तनातें ॥
साई सुता आर्जविही । यजुनी जनातें ॥ ४ ॥

## अभंग.

परब्रह्म रूपी पिता रामचंद्र । लक्ष्मी मम माता वंदूनियां ॥
तैसा श्री सद्गुरू साई योगीराज । वंदूं परात्पर प्रेमभावें ॥
आतां गुरुराया परिसा विज्ञापना । देई दानदीना उदारत्वें ॥
वैराग्यतें भक्ति आणि ज्ञान युक्त । देई कृपावंत होऊनीयां ॥
आणीक नलगे तुझियावांचून । पतित मी हीन हेंची मागें ॥
ध्रुवा अढळपद दिसतसे लोकां । सदेही तो तुका स्वीकारीला ॥
मज अनाथाचा स्वीकार करीतां । लाजसी कां चित्ता साइनाथा ॥
समर्थाच्या दासीं कोणी कडे जावें । कोणासीं विनवावें साईताता ॥
नाहीं तुजवीण मज कोणवाली । ब्रीद तें सांभाळी गुरूराया ॥
वेद शास्त्रें सर्व तूज वाखाणीती । कनवाळू माऊली तूंची एक ॥
तूंची एक माझा जिवाचा निवास । नाहीं वसवस संसाराची ॥
दीनदासी हीरा तुझीच आर्श्रीत । दिसेल उचीत तेंची करी ॥
पवित्र तो दीन गुरुपौर्णिमेचा । तळमळ जीवा बहू झाली ॥
अमूर्त ते मूर्त दिसेल नयनीं । म्हणुनियां केली कासावीसी ॥
परंतु समर्थें आणिला नाहीं योग । दुर्धर तो भोग ज्वर आला ॥
अनंताचे हेत अनंतची जाणें । इतर ते नेणे लीला त्यांची ॥

पद- ( मूर्तिमंत भीति उभी या. चालीवर )

संत साई नाममुखीं, प्रेमभरें गातसा ॥ उत्कंठित व्हा तुम्हीं । मग उशीर कायसा ॥ नाम तें करील चित्त । शुद्ध जेवि आरसा ॥ कृपासिंधु दीन बंधु तुजदिसेल राजसा ॥ रोमगुढी उभारती । हर्षमान कृपणसा ॥ १ ॥ संतसाई ॥

ब्रम्हानंदी चित्त हारपे । प्रपंच होय असारसा ॥ त्याचा तोची -श्रोत्र वदन । ऐकवील श्रुतिरसा ॥ कर्मातीत व्हाल ज्ञानी । मुक्तभाव नाहीसा । सद्गुरूंचि ऐसी कृपा । ध्याता ध्येय समरसा ॥ मूढ हिरा नाम-रूप । मिथ्या भास मृगावुसा ॥ संतसाई ।

॥ ॐ ॥

सौमित्रविरचित

# श्रीसाईनाथस्तोत्रम्.

## शिखरिणी वृत्त.

अगा साईनाथा, मजवरि कृपापूर्ण दिससी ।
विलोकोनी मातें पदनत, कदापी न हससी ॥
जगत्कल्याणार्थी धरिसि अवतारा महिवरी ।
जसा गीतेमध्यें प्रकटुनि वदे यादव हरि ॥ १ ॥

श्रुतिस्मृत्यादींच्या स्वरुपि अवतारा धरुनिया ।
विवस्वच्चंद्रांला करिसि तव साक्षीस वसण्या ॥
जयाच्या पादांना नमन करितां सिद्धि मिळते ।
नमूं त्या साईनां, यदिय स्मरणें दुःख पळतें ॥ २ ॥

स्थिरैश्वर्यां वाणी खचुनि भरली ज्या हृदिं मुदें ।
तयाला पाहोनी दिपलि लपलीं गर्व-कुमुदें ॥
असा बोधात्मा तो श्रुतिस्मृति जयामाजि दिसती ।
नमूं त्या साईनां, गुरुगुरु जया सर्व म्हणती ॥ ३ ॥

करी साक्षात्कारें विमलतर ब्रम्हांड भरतें ।
चिदाभासें दावी कणकणिंहि प्रत्यक्षपण तें ॥
पहा जो यच्चावत् चर अचर सृष्टींत विलसे ।
नमूं त्या सांईनां, सुधि वदति ज्यांना नर असें ॥ ४ ॥

अहा जीवात्मा तो कथिति नरसंज्ञात्मक असा ।
जयाला राहे तो सतत धरुनी आश्रयि तसा ॥

तयाला संबोधी अखिल जन नारायण असें ।
नमूं त्या साई, जो उघडचि नराकारण वसे ॥ ५ ॥
जयाच्या कार्यी तें जननि परमात्मा स्फुट रवें ।
धरी अंगीं भारी पृथकपण श्रेष्ठत्व बरवें ॥
सदा भासे सच्चिन्मुदस्वरूप साकारचि कसा ।
नमूं त्या साई, जो परम करुणात्मा शिव तसा ॥ ६ ॥
अशा त्या आत्म्याच्या त्रिगुणयुत निर्दिष्ट उपरी ।
यथार्थ ज्ञानातें करुनि मन संतुष्टचि करी ॥
जयाला नादात्मा स्वकिय हृदया जाणुनि धरी ।
नमूं त्या साईनां, सुखकर जयाचीच नगरी ॥ ७ ॥
जगत्राता ऐसा परमकरुणायुक्त सजला ।
ममात्म्याचे ठायीं स्फुरण करण्या स्पष्ट नटला ॥
म्हणूनी मद्वाणी तदिय भजनीं पूर्ण भरली ।
नमूं त्या साईनां, कृति यदिय साक्षेंच तरली ॥ ८ ॥
विधी जो विष्णू जो शिव त्रिगुणरूपात्मक असा ।
विडौजस वायू कीं शशिरविबृहद्भानुहविसा ॥
ममात्मा सर्वात्मा स्थिरचर यदाकार सगळें ।
नमूं त्या साईनां; हृदयज अहंभाव वितळे ॥ ९ ॥
खरा ज्ञानानंदीं वसुनि वसुधा सर्व बघतो ।
भजे जो जैसा त्या समचि अवना साच करितो ॥
अहा मोक्षार्थातें पदरिं पडण्या सिद्ध बनुनी ।
नमूं त्या साईनां, अढळ मन रूपांत भरूनी ॥ १० ॥
जलासंगें अश्मासम सुवचनातें जगति या ।
त्रयी रत्नांची ही निपजवि अशा जाण हृदया ॥
मका मोहा पावूं उपलज मणीतें बघुनियां ।
नमूं त्या साईनां, सुखद परमानंद बनुंया ॥ ११ ॥

---

वरील स्तोत्र इ. स. १९१७ मध्यें रा. रा. नानासाहेब खाजगीवाले यानीं छापून प्रसिद्ध केलें होतें.

## आरती.

(चाल-आरती भुवनसुंदराची०)

वर्णितां थकलि वाणिदेवी । स्वरूपा अशा वर्णू केवी ॥ ध्रु०॥
उत्सव थोर मनीं झाला । जैसा भाव वधुनि बाला ॥
सुमाला देहवृक्ष आला । अर्पितों भक्तिच्या या फुला ॥
चाल ॥ साईनाथा; तव रे बोध । त्यानें शोधित केला क्रोध ॥
तैसा षड्रिपुंचाही शोध ॥ होऊनि, मनि नच येइ विरोध ॥
चाल ॥ तव ते पाय । हीच मम माय । तरुनि मज नेय ॥
म्हणुनि मी गाय । कीर्ति बरवी । सौमित्रनुती भायकावी ॥ ध्रु० ॥

---

श्रीसाईमहाराजांची दुसरी पुण्यतिथि आश्विन शुद्ध १० शके १८४२ शुक्रवार दा० २२ आक्टोबर सन १९२० रोजीं श्रीसमाधीसमोर म्हणण्यांत आलेली पद्यें:—

अभंग

नाहीं कुठें गेला, हृदयीं वसला । वाटतें मजला बाबा साई ॥ १॥
जागृत ठेवितो मज ठायीं ठायीं । अनेक उपायीं गुरु माझा ॥ २ ॥
दीनाचा दयाळु ऐसा नाहीं कोणी । तनु झिजवोनी गुरु झाला ॥ ३ ॥
आतां नाहीं भय उरले या जीवा । दासीचा विसावा सद्गुरु तो ॥ ४ ॥

२

सत्य सद्गुरूंचें लक्षण सांगतो । शब्द ऐकवितो सिद्धांचे ते ॥ १ ॥
मनाचा निग्रह पर उपकार । निर्मळ अंतर असों द्यावें ॥ २ ॥
शास्त्रज्ञानविद्या अभ्यासें साधावी । संगति धरावी सज्जनाची ॥ ३ ॥
इंद्रियनिग्रह धर्मक्षमाशांति । जेणें आत्मोन्नति घडतसे ॥ ४ ॥
दास म्हणे येणें जन्माचें सार्थक । करूंया भाविक तुम्ही आम्ही ॥ ५ ॥

आर्या

जो नर मानवदेहीं स्मरण करी नित्य गुरुपदाब्जाचें ।
दैव सहाय तयाला, पुण्य खरें तें अनंत जन्मांचें ॥ १ ॥

सद्गुरुसद्बोधाचें चिंतन मनिं जो पुनःपुन्हा करितो ।
त्यातें भवतरणाला साधन गुरु जो स्वयेंचि दाखवितो ॥ २ ॥

ध्यान भजन पूजन हीं सर्वचि कीं श्रेष्ठ साधनें पाहीं ।
यांतुनि अवलंबावा मार्ग कवण हें अम्हीं कळत नाहीं ॥ ३ ॥
म्हणुनी मार्गनिदर्शक सद्गुरुचरणीं त्वरें शरण जावें ।
गुरुनें जो दाखविला त्या मार्गा अनुसरून चालावें ॥ ४ ॥

श्लोक ( शा. वि. )

संसारीं दृढ निश्चया न ढळुं दे त्याचीच ख्याती खरी ।
सप्रेमें भजतां विवेक पदरीं बांधील तो श्रीहरी ॥
सन्मार्गीं वळवो कुमार्ग टळवो साई स्वताच्या करीं ।
नाथाचीच कृपा निरंतर असो तुम्हां सुभक्तांवरी ॥ १ ॥

श्रीसाईबाबा महाराजकी जय

* दास दासी.

॥ श्रीसद्गुरु साईनाथार्पणमस्तु ॥

---

* कळविण्यास वाईट वाटतें कीं, यांपैकीं दास म्हणजे रा. रा. रघुनाथराव विठ्ठल तेंडुलकर यांस इ० स० १९२२ सालीं देवाज्ञा झाली.

यांच्या भक्तिपरिप्लुत व गोड वाणीचा अनुभव घेऊं इच्छिणाऱ्यांसाठी आपली आठवण म्हणून त्यांनीं स्वयंस्फूर्तीनें गाइलेलीं शेंकडों मधूर पद्यें आपल्या भजन मालेंत ठेवून ते गेले आहेत "मरावें परी कीर्तिरूपें उरावें"

रामदास

# ॥ दासगणूकृत गुरुपाठाचे अभंगांतील उतारा.

ज्याचीं तीं रूपें सगुण निर्गुण ॥ ऐसा नारायण वंदू आधीं ॥
सगूण सेवितां निर्गूण ये हातीं ॥ निर्गुणाची प्राप्ती आरंभी ना ॥
आधिं मूल काढी क, ख, बाराखडी ॥ मग शब्द जोडी झाल्या ज्ञान ॥
गणू म्हणे तैसी सगुणोपासना ॥ बाराखडी जाणा अध्यात्माची ॥ १ ॥

तो ही बाराखडी शिकवी जो गुरू ॥ भवाब्धीचें तारूं तोच जाणा ॥
गुरुसेवा हीच प्रथम पायरी ॥ असे टिकण्या भारी अवघड ॥
सद्गुरूरायाची कृपा संपादीतां ॥ सेवेची पूर्तता सहज होई ॥
गणु ह्मणे केल्या प्रसन्न सविता ॥ प्रभेची न्यूनता कोंठें पडे ॥ २ ॥

सद्गुरूची सेवा बहूतांनीं केली ॥ ऐसी साक्ष दिधली पुराणांनीं ॥
पूर्णब्रह्म-राम जानकीचा कान्त ॥ झाला शरणागत वसिष्ठांसी ॥
निष्ठावंत भाव हाच देतो फळ ॥ अभक्तिचा मळ निमालीया ॥
चहाड दुतोंडया ऐसा नारद–मुनी ॥ परि झाला तरणी प्रल्हादातें ॥
गोपिचंदें गुरू लिदीसी गाढीला ॥ पुढें तोचि झाला वंद्य त्यातें ॥
गणु म्हणे सोनें चढे मोला अंगें ॥ कसोटीच्या संगें जगामाजी ॥ ३ ॥

क्षमा, शांती, दया असे जया ठायीं ॥ तैसें ज्ञान पाही संपूर्ण तें ॥
जयाचिये शिरीं ईश्वराचा हात ॥ तोच सद्गुरू नाथ करावा हो ॥
बाहेरील सोंगा भुलुं नका कदा ॥ पतंगातें दगा दीपापाशीं ॥
गणु ह्मणे हंस पाण्यातें टाकूनी ॥ घेतसे शोधोनी जैसें दूध ॥ ४ ॥

हिरे आणि गारा एक्याच खाणींत ॥ तैसे बद्ध मुक्त जगामाजी ॥
पारखी तो येतां हिरा घे वेंचोनि ॥ कुक्कूट पायांनीं कालवी तो ॥

मुमुक्षु पारखो चार्वाक कोंबडा ।। कुक्कूटा उकिरडा गोड वाटे ॥
गणु ह्मणे जो कां असे भाग्यवंत ।। तयाचाच हेत गुरुपायीं ।। ५ ॥

क्षमा शांतीयुक्त भवाब्धींचें जहाज ।। ऐसा सद्गुरुराज शिर्डीमाजीं ।।
नामाविधा ज्याची शोभे बाबासाई ॥ अनाथांची माई तीच जाणा ।।
अनाथ सनाथ हा भेद जेथें ॥ सूर्य प्रकाशातें निवड कैंची ॥
माझा गुरुराज जान्हवीचें जळ ।। गणु अर्पी भाळ तयापायीं ।। ६ ॥

अंगकांठी उंच केलीसे धारण ॥ कळवावया खूण भक्तजनां ।।
उच्चज्ञान जें कां अध्यात्म साजीरें ।। तेंचि सेवा सारें कल्याणार्थ ।।
परि नका सोडूं ठेंगणी लीनता ।। न ये थोर होतां बाल्यावीण ।।
गणु ह्मणे वर्ण तांबूस सांवळा ॥ सद्गुरूची लीळा अगाधची ।। ७ ॥

सद्गुरूरायानें जला तेल केलें ।। दीप ऊजळीले लक्षावधी ।।
ठेउनियां दीप उशा पायथ्यांसीं ।। पहुडे फळीसी गुरूमूर्ती ।।
त्यांच्या त्या कृतीचा हाच आहे अर्थ ॥ कदा अंधारांत निजूं नये ।।
गणु ह्मणे माया दुर्धर अंधार ।। ज्ञानदीप थोर ह्मणुनी लांवा ॥ ८ ॥

शिवविष्णू ब्रह्मरूप बाबासाई ॥ भाव दूजा कांहीं मानूं नका ॥
सद्गुरुरायाच्या पायाची जी धुळ ।। तेंच गंगाजळ शुद्ध माना ।।
अमृता आगळीं मुखीचीं वचनें ।। तींच माना मनें गीता जेवीं ।।
गणु ह्मणे बाबा वसंत सोज्वळ ।। भक्तांनो कोकीळ व्हारे तुह्मी ।। ९ ॥

परमार्थाची आस ज्यास मनापून ॥ त्यानें हे चरण पहावे आधीं ।।
ऐहिक सुखासी देवोनियां फांटा ।। भक्तीच्या वाटा धुंडाळाव्या ।।
द्वेषाचे सराटे फेकूनीयां द्यावे ।। साईमय पाहावें जगालागीं ।।
गणु ह्मणे तरी तुह्मीं त्यांचे भक्त ।। शोभाल जगांत सज्जनांनो ।। १० ॥

शिर्डीक्षेत्र नोहे पचंबा बाजार ।। तेथें दुकानदार परमार्थाचा ।।
ऐहिक सुखाची खेळणीं बाहूल्या ।। समूळ फेंकिल्या गुरूरायें ।।
कां कीं तयामाजीं किमपि ना अर्थ ।। फसतील व्यर्थ पोरें माझीं ।।
गणु ह्मणे पोर पचंब्यासी जातें ।।किरकिरेंच घेतें आवडीनें ।। ११ ॥

कर्म भक्ती ज्ञान बाजारीं या माल ।। मनीं जो वाटेल तोचि घ्यावा ।।
तिघांची किंमत एक आहे जाणा ।। फळहि तिघांना एकची हो ।।
भावरूपि द्रव्य पाहिजे तयासीं ।। साई सद्गुरूसी दूजें न लागे ।।
गणु ह्मणे भाव नाणें जयापासीं ।। त्यानें बाजारासी येथें जावें ।। १२ ।।

फळ तें पाथेय घ्यावें फराळाशीं ।। मग पंढरीसी जावें सूखें ।।
बाबाजीनें कृपा तुकोबासी केली ।। तयिंच फळली पंढरी त्या ।।
थापटणें गोऱ्यानें मारूनि नाम्याला ।। कच्चा ठरविला देवापुढें ।।
गणु ह्मणे मग खेचर माऊली ।। नाम्यानें वंदीली कल्याणार्थं ।। १३ ।।

निवृत्ती ज्ञानेश ईश्वरी अवतार ।। परी गुरूवर गहिनी केला ।।
गुरूकृपेवीण एकालाही जनीं ।। विठू चक्रपाणी भेटला ना ।।
पंढरीरायाची मनि असल्या आस ।। सद्गुरूची कांस दृढ धरा ।।
गणु ह्मणे तया भवाचें ना भय ।। ज्याचे चित्तिं पाय सद्गुरूचे ।। १४ ।।

शुक सनकादि नारद अंबरीष ।। निवृत्ती ज्ञानेश नामा तुका ।।
दासतुलसी चोखा जयदेव सांवता ।। पंत नाथ मेहेता कबीर तो ।।
बोधलें पवार विसोबा खेचर ।। गोरोबा कुंभार कूर्मदास ।।
गणु ह्मणे त्याच कोटींतला साई ।। चला त्याच्या पायीं लीन होऊं ।। १५ ।।

जरि त्या संतांच्या मूर्ती हो लोपल्या ।। साईरूपें उरल्या पहावया ।।
त्रिभुवनाभाजीं जे जे कोणी संत ।। ते ते साईनाथ मजलागीं ।।
भेदबुद्धी नुपजो माझी संताठायीं ।। संत शेषशाई प्रत्यक्षची ।।
गणुदास आहे सतांचा अंकीत ।। भेटो पंढरिनाथ त्याच्या कृपें ।। १६ ।।

भक्तिरूप गंगा वाहे जया ठायीं ।। तेथें माझा साई राहे उभा ।।
हस्त संकेतानें पालवीतो लोकां ।। या हो फिरूं नका रानोमाळ ।।
मज ओळखावें आहे मी कोठला ।। कशासाठीं आला शिरडीसी ।।
पंढरी क्षेत्रींचा मीच हो वाटाड्या ।। गणूच्या त्या उड्या साईबळें ।। १७ ।।

मज न विचारीतां पंढरीच्या वाटे ।। जाल तरी कांटे रुततील ।।
पंढरीची वाट मोठी अवघड ।। मोठे मोठे पहाड मार्गामाजीं ।।

तयाचें तें वज्र आहे मजपाशीं ॥ तसा हृषीकेशी ओळखीचा ॥
गणु ह्मणे जन्मोजन्मीं नाहीं तूटी ॥ साईच्या जगजेठीं हृदयांत ॥ १८ ॥

ह्मणून ही संधी दवडुं नका कोणी ॥ पडाल मागूनी पस्ताव्यांत ॥
दंभाचें गांठोडें एकीकडे ठेवा ॥ विकल्प सोडावा घातक जो ॥
क्रोधाची ती होळी ज्ञानाग्नीनें करा ॥ वासनेसी मारा अभ्यासानें ॥
गणु ह्मणे ऐशा व्रतासी जो पाळी ॥ तयासी सांभाळी साई माझा ॥ १९ ॥

करुं नका नाश या आयुष्याचा ॥ जन्म मानवाचा पुन्हां नाहीं ॥
प्रत्येक जन्मांत कन्या पोरें घर ॥ मैथुन आहार आणि निद्रा ॥
नरजन्म नाहीं ऐशा कृत्यासाठीं ॥ बांधा खूण गांठीं मनामाजी ॥
जोडुं जाता जोडे जन्मीं या ईश्वर ॥ नर जन्म थोर गणु ह्मणे ॥ २० ॥

लोभ मोह माया टाकून अवघ्यांची ॥ धरा सद्गुरुचीं पाऊलें तीं ॥
गुरुपायामाजीं आहे सर्व कांहीं ॥ गुरुवीण नाहीं सार्थकता ॥
गुरू कामधेनू गुरू कल्पलता ॥ चिंतेसी वारीता चिंतामणी ॥
गुरू भक्ती ठायीं जो कां एकनिष्ठ ॥ त्रिलोकीं तो श्रेष्ठ गणू ह्मणे ॥ २१ ॥

भाव साधकांनों ठेवा साईपायीं ॥ परि विठाबाई गात्रि वाचे ॥
साईचें पूजन देवाचें चिंतन ॥ राखावा सन्मान भूपतीचा ॥
परमार्थांत भक्ती व्यवहारी नीती ॥ संसारीं विरक्ती असों द्यावी ॥
गणु म्हणे तरी होईल कल्याण ॥ साइचे वचन हेंचि वाहो ॥ २२ ॥

गुरुपाठाचे हे अभंग पंचवीस ॥ जपतां होय नाश पातकांचा ॥
सांईचे पवाडे गातां मोक्ष लाधे ॥ नका मरूं दंभें निरर्थक ॥
सांईमहाराजांचा धरूनीयां हात ॥ तरा भवाब्धींत बुडूं नका ॥
साईच्या इच्छेनें होतें अवघें कांहीं ॥ गणुकडे नाही बोल त्याचा ॥ २३ ॥

---

टीप १ मूळ अभंग पंचवीस आहेत पण उतारा घेतांना त्यांपैकी फक्त बावीसच घेतले आहेत.

# आतांपर्यंत छापून आलेल्या महाराजांच्या लीला.

१. महाराज रात्रीं एका फळीवर निजत असत. ती फळी मशिदीच्या एका आढयाला फाटक्या चिंध्या बांधून टांगलेली असे. महाराजांना त्या फळीवर चढतांना किंवा उतरतांना पहाण्याची उत्कंठा पुष्कळ मंडळीला होई, आणि पुष्कळांनीं तासचे तास तें पहाण्यासाठीं वाट पहात रहावें पण महाराजांनां चढतांना किंवा उतरतांना कधीं कोणींही पाहिलें नाहीं एक तर ते खालीं जमिनीवर दिसत, किंवा फळीवर बसलेले किंवा निजलेले दिसत. फळीच्या उशापायथ्याला पणत्या लावलेल्या असत. हा प्रकार पुष्कळ वर्षे चालला होता. नंतर एके दिवशीं महाराजांनीं ती फळी तोडून टाकिली हा फळीचा प्रकार ज्यांनीं प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिला, अशी मंडळी नुसत्या शिर्डीसच नव्हे, तर बाहेरगांवींसुद्धां पुष्कळ आहेत.

२ एकदां एक कथेकरी बुवा, नानासाहेब चांदोरकर आणि आणखी दुसरे दोन गृहस्थ असे मिळून महाराजांच्या दर्शनास गेले. दर्शन झाल्यावर कथेकरीबुवांस परत जाण्याची घाई झाली. कारण दुसरे दिवशीं नगरास त्यांची कथा व्हावयाची होती. नानासाहेब चांदोरकरांनीं महाराजांस जाण्याची परवानगी विचारली तेव्हां महाराज ह्मणाले " जेऊन जा. " नानासाहेबांनीं कथेकरीबुवांस रहाण्याविषयीं विनंति केली, पण ते राहीनात, आणि ते आणि त्यांचे एक स्नेही तात्यडतोब संवत्सर उर्फ धारी स्टेशनावर जाण्यासाठीं निघून गेले. नानासाहेबांना त्या वेळेस महाराजांनीं ह्मटलें " पहा, कसे लोक मतलबी असतात! वेळ आली ह्मणजे साथीदाराला सोडून आपल्या मतलबाला दक्ष असतात. म्हणून आपण असा साथी करावा कीं, जो आपल्याला कल्पांतींही सोडणार नाहीं."

अर्थात् सद्गुरुवांशिवाय असा दुसरा साथी कोण मिळणार आहे? ह्मणून साथी करावयाचें तर त्यांनाच करावें. प्रेम भूतमात्रावर असावें, पण संग सद्गुरूचाच करावा. तोच संग खरा सुखकर होतो. असो.

महाराजांच्या आज्ञेप्रमाणें नानासाहेब व त्यांचे स्नेही शिरडीसच जेवण करून महाराजांची आज्ञा घेऊन निघाले. निघतांना महाराज ह्मणाले "अजून गाडीस अवकाश आहे." ते स्टेशनावर येऊन पहातात तों

गाडीला खरोखरच अवकाश होता, आणि कथेकरीबुवा व त्यांचे स्नेही दुर्मुखलेली तोंडें करून गाडीची वाट पहात बसले होते. नानासाहेबांनीं त्यांना विचारलें "तुमची गाडी चुकली कीं काय ?"

बुवा ह्मणाले "नाहीं, आज गाडीस तीन घंटे उशीर आहे. तुम्ही महाराजांचें ऐकीलेंत, फार चांगलें केलें. आह्मीं ऐकिलें नाहीं त्यामुळें उपाशीं मात्र राहिलों."

मग थोड्या वेळानें गाडी आली आणि सगळेजण तींत बसून नगरास गेले.

३. शिरडी येथें आप्पा नावांचा एक कुळकर्णी होता. तो महाराजांचा परम भक्त होता त्याच्यावर पैसे खाण्याचा आळ गांवांतील कांहीं टवाळ मंडळींनीं आणला होता, व त्याचा त्या कामीं जबाब घेण्याकरितां प्रांताच्या साहेबानें त्याला हुकूम धाडून बोलाविलें, तेव्हां तो अतिशय घाबरला आणि जातेवेळीं महाराजांची परवानगी घेण्यास तो मशीदींत गेला. महाराजांनीं त्याला सांगितलें "प्रांताचे साहेब नेवाश्यास आहेत, तेंथें जा. तेथें प्रथम श्री मोहिनीराजांला वंदन कर, आणि मग साहेबाकडे जाऊन जबाब दे."

आप्पानें त्याप्रमाणें केलें. साहेबानें त्याचा जबाब ऐकून त्याला सोडून दिलें आणि ह्मटलें, कीं "तूं पैसे खाल्ले नाहींस असें खात्रीनें मला वाटतें."

आप्पा अर्थातच बाहेर पडल्याबरोबर नाचूं लागला, आणि महाराजांचे गुणानुवाद गाऊं लागला. नंतर शिरडीस जाऊन सर्व हकीकत त्यानें महाराजांस कळविली. महाराजांनीं अर्थात आपल्याकडे कांहीं कर्तृत्व न घेतां " कर्ता करविता परमेश्वर आहे; तो भक्तांसाठीं अघटित गोष्टी घडवून आणतो," असें उत्तर दिलें.

४ एके दिवशीं महाराजांनीं आप्पा कुळकर्णी यांस सांगितलें, कीं, "आपल्या गांवांत चोर आले आहेत, आणि त्यांची स्वारी प्रथमतः तुझ्यावर होईल; तर तूं आपला बंदोबस्त कर. हे चोर मोठे बिलंदर आहेत. त्यांची सर्व दृष्टी ऐन मालावर असते, आणि तेवढाच ते घेऊन जातात." आप्पानें या बोलण्याचा लौकिकी अर्थ केला, आणि सरकार धाऱ्याचे पैसे त्यानें चावडींत ठेविले होते तेथें जागल्यास पहाऱ्यास बसवून लौकिकी बंदोबस्त केला. परंतु महाराजांनीं सुचविलेले चोर निराळेच होते.

ते चोर ह्मणजे यमदूत. महाराजांनीं बजावल्यानंतर थोड्याच वेळानें आप्पाला जुलाब, उलट्या होऊं लागल्या, आणि त्यांतच त्याचा देहांत झाला. तो अत्यवस्थ असतांना त्याची बायको महाराजांकडे जाऊन रडूं लागली. महाराजांनीं तिला कांहीं बोध केला, आणि तिचें सांत्वन केलें. दुसऱ्या दिवशीं आणखी गांवांत दोनतीन लोक लागले, तेव्हां गांवकरी मंडळी महाराजांकडे गेली, आणि आम्हांला सांभाळा, अशी प्रार्थना करूं लागली. महाराज ह्मणाले "एकंदर सात माणसें जातील, आणि मग महामारी रहाणार नाही." त्याप्रमाणें फक्त सातच माणसें मेलीं, आणि नंतर गावांतील पटकी नाहींशी झाली.

५. शिरडीस कोंड्या सुतार नांवाचा एक महाराजाचा भक्त होता. त्याला एके दिवशीं दोनप्रहरीं महाराज ह्मणाले "खळवाडीस आग लागली आहे, तर तूं तिकडे जा." दिवस उन्हाळ्याचे होते, आणि वेळ भर दोनप्रहरची. तरी पण कोंड्या धांवत खळवाडीकडे गेला, आणि पहातो तों तेथें आगबीग कांहीं नाही. मग लगेच परतून तो महाराजांकडे आला आणि ह्मणूं लागला "तेथें आगबीग कांहीं नाहीं. मला भर दोनप्रहरीं उन्हांतून कां फेरा दिलात ?

तेव्हां महाराज ह्मणाले "मागें वळून पहा."

मागें वळून पहातो तों खळवाडींतली एक गवताची गंज खरोखरच पेटलेली असून तिच्यांतून निघणारा धूर कोंड्याला दिसला. तितक्यांत जोराचा वाराही सुटला आणि गांवांत सगळी एकच गडबड उडाली. आतां सगळ्या गंजीं जळल्याशिवाय रहावयाच्या नाहींत, आणि सर्वांचें अतिशय नुकसान होईल, असें गांवकरी लोकांस वाटूं लागलें. ते सर्व घाबरलें आणि महाराजांना शरण गेले. महाराज अति दयाळू. ते तातडतोब त्यांच्याबरोबर खळवाडीकडे गेले, आणि जळत असलेल्या गंजीच्या सभोंवती त्यांनीं पाण्याची धार फिरविली. नंतर गांवकऱ्यांस ह्मटलें "ही एवढीच गंज जळेल. बाकीच्या गंजीला धक्का लागणार नाहीं." आणि तसेंच झालें.

७. नानासाहेब वेरे नांवाचे गृहस्थ शेतकी खात्यांत इन्स्पेक्टर होते. ते महाराजांचे भक्त होते. ते एकदां महाराजांच्या दर्शनाला गेले असतां महाराज त्यांना म्हणाले "तुम्ही आतांच येथून निघून स्टेशनवर जा

थोडाही उशीर करूं नका. आणि तडक स्टेशनावर ( कोपरगांव
स्टेशनावर ) जा."

त्याप्रमाणें वेरे तावडतोब निघाले. त्यांनीं टांगा भरधांव हांकला.
त्यांच्या टांग्याच्या मागोमाग दुसरा टांगा येत होता, त्यांत जे गृहस्थ
बसले होते ते वेऱ्यांना म्हणाले "अजून गाडीला बराच वेळ आहे.
इतकी घाई कां करतां ? आपण सावकाश जाऊं." वेऱ्यांनीं त्यांचें म्हणणें
मान्य केलें नाहीं, आणि ते तडक स्टेशनावर गेले. नंतर कांहीं वेळानें
बातमी आली, कीं, वेऱ्यांच्या मागून जो टांगा सावकाश येत होता तो
चोरांनीं गांठला, त्यांत होतें तें सर्व लुटलें, आणि त्यांत बसलेल्या मंड-
ळींस मारहाणही केली. ही बातमी समजली, तेव्हां महाराजांच्या आज्ञेचें
वेऱ्यांना कौतुक वाटलें आणि महाराजांनींच आपल्याला आज वांचविलें,
असें ते म्हणूं लागले.

वरील हकीकतीवरून महाराजांच्या लोकोत्तरपणाबद्दल अनुमान होतें,
आणि प्रत्यक्ष दर्शनानें व सहवासानें तें अनुमान दृढ होऊन महाराज
खरे खरे सद्गुरू आहेत ही खात्री पटते, आणि त्यांना सर्वस्वी शरण
जाणें हाच खरा तरणोपायाचा मार्ग, असा मनाचा निश्चय होऊन
आपल्या ग्रंथांतून संतांचीं आणि सद्गुरूंचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत
तीं सर्व महाराजांच्या आंगीं वसत आहेत, हीही खात्री होते.

महाराजांच्या गुणांचें किंवा त्यांच्या लीलांचें यथार्थ वर्णन करणें
अशक्य आहे; तरी पण थोडें दिग्दर्शन तरी व्हावें असें वाटतें. हें करा-
वयाचा उत्तम मार्ग म्हणजे मला किंवा माझ्या माहितींत दुसऱ्यांना
आलेल्या असंख्य अनुभवांपैकीं कांहीं गोष्टी येथे नमूद करणें; असें
वाटल्यावरून तसें करीत आहें.

मेघा नांवाचा गुजराथी ब्राह्मण महाराजांचा परम भक्त होता. तो एके
दिवशीं महाराजांच्या तसबिरीजवळ भिंतीवर शेंदराचा त्रिशूळ काढवीत
होता. तें पाहून मी त्याला विचारलें "हें कां काढवितोस

मेघा म्हणाला "आज पहाटेस मी जागा झालों. बिछान्यावरच पडलो
होतों, इतक्यांत महाराजांचा आवाज कानीं पडला असा भास झाला,
आणि जे शब्द मीं ऐकिले ते असे 'मेघा, त्रिशूळ काढ !' त्या वेळेस
पाहिलें, तों बाबा ( महाराजांस बहुतेक मंडळी 'बाबा' म्हणतात
[illegible] नाहींत. आणि आमच्या वाड्याचीं दोन्हीकडील दारें बंद होती

आवाज मात्र बाबांचा, आणि अंथरुणावर कांहीं अक्षता पडलेल्या. मी लगेच उठलों, आणि मशिदींत बाबाच्याकडे जाऊन विचारलें 'बाबा त्रिशूळ काढावयाचा का?' बाबा म्हणाले 'होय.' म्हणून हा त्रिशूळ काढवीत आहे."

हें बोलणें झाल्यावर दुसरे दिवशीं सकाळीं सुमारें दहा वाजतां मेघा श्रीकडे गेला असतां बाबांनीं त्याला एक शिवलिंग दिलें; तें त्याच वेळेला कोणी बाबांच्या हातांत आणून दिलें होते; श्री त्यास म्हणाले "मेघा, हें घेऊन जा, आणि याची पूजा करीत जा."

मेघा तें शिवलिंग घेऊन वाड्यांत आला आणि त्यानें तें मला दाखविलें आणि म्हटलें "हें पहा मला बाबांनीं पूजा करण्यास शिवलिंग दिलें!" त्या वेळची त्याची मुद्रा अति आनंदाची होती. त्या आनंदाचे विशेष महत्त्व कळण्यासाठीं त्याचा थोडा पूर्वेतिहास सांगणें जरूर आहे.

हा मेघा रावबहादुर हरि विनायक साठे यांच्याजवळ,ते खेडा जिल्ह्यांत डेप्युटी कलेक्टर असतांना नोकर होता. त्याला गायत्री मंत्रही येत नव्हता. तो त्याला रावबहादुर साठ्यांनींच शिकविला. पुढे कांहीं दिवसांनीं त्याला एका शिवालयांत पूजा करण्यासाठीं साठ्यांनीं ठेवला. त्यानंतर साठे श्रीकडे गेले, आणि त्यांची श्रद्धा श्रीचे चरणीं बसली, व त्यांनीं शिर्डीस एक वाडाही महाराजांच्या दर्शनास येणाऱ्या मंडळीच्या सोयीसाठीं बांधला. साठ्यांना अशी इच्छा झाली, कीं, मेघाला शिर्डीसच महाराजांचे सेवेसाठीं ठेवावा, व त्याप्रमाणे त्यास त्यांनीं सांगितलें. तें ऐकून मेघा खिन्न झाला.महाराज मुसलमान आहेत हें त्यानें ऐकिलें होतें, आणि शंकराची पूजा सोडून मुसलमानाची सेवा करण्यास आपले मालक आपल्यास पाठवीत आहेत, हेंच त्याच्या खिन्नतेचें कारण होते. साठ्यांनीं त्याची समजूत केली, आणि महाराजांच्या खऱ्या स्वरूपाची थोडीशी ओळख करून दिली. त्यानें त्याची खिन्नता पुष्कळ कमी झाली, तरी पण पार गेली नाहीं. मग तो शिर्डीस गेला. त्यानें मशिदीच्या कंपाउंडांत पाय ठेवितांच महाराज उठले, आणि हातांत धोंडा घेऊन म्हणाले "वर येऊं नकोस.खबरदार येशील तर.मुसलमानाकडे कशाला आलास!"

महाराजांचा राग वरवर असून फक्त ओळख देण्यापुरताच होता, तो तेव्हांच शमला. मेघा कांहीं दिवस शिर्डीस राहिला आणि पुनः आपल्या

गांवीं गेला. पण तेथें त्याला महाराजांचा इतका ध्यास लागला, कीं, तो पुन: लवकरच शिर्डीस गेला, आणि तेथेंच राहिला. तो बाबांस शंकरच मानीत असे, आणि नित्य 'शंकर शंकर' असेंच म्हणत असे, आणि बाबांचा उल्लेख करावयाचा तर शंकर याच नांवानें करीत असे. पुढें बाबांची एक मोठी तसबीर साठयांच्या वाडयांत आणून ठेविली. तेव्हांपासून त्या तसबिरीची शंकर मानूनच तो पूजा करीत असे. त्या नंतर सुमारें एक वर्षानें वर लिहिलेला प्रकार घडून आला. शिवलिंग महाराजांच्या हातांत येण्याच्या आदले दिवशीं मेघाला त्रिशूळ काढण्याची आज्ञा झाली, आणि तीही महाराज प्रत्यक्ष जवळ दृश्य नसतां; पण आवाज मात्र त्यांचा. या चमत्कारांचें कौतुक वाटतेंच; पण यांत दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी ही कीं, मेघाची जी उपासना होती तीच महाराजांनीं त्याला कायम करून दिली. महाराजांच्या आरतींत म्हटल्या-प्रमाणें "**जया मनीं जैसा भाव। तया तैसा अनुभव। दाविशी दयाघना पेशी। तुझी ही माव॥** हा प्रकार नेहमीं अनुभवास येतो.

माझे एक स्नेही हायकोर्टांत वकील आहेत. ते महाराजांच्या दर्शनास प्रथम गेले असतां एके दिवशीं असा योग आला कीं, फक्त महाराज आणि ते असे दोघेच होते. त्या वेळीं महाराजांनीं त्यांस म्हटलें "काय म्हणावें! श्रीराम जयराम, जयजयराम!" नंतर एकदोन मिनिटांनीं महा-राजांनीं पुन: तेच शब्द उच्चारले, तेव्हां त्या गृहस्थाला एकदम आठ-वण झाली, कीं, हा तर आपल्या गुरूनें आपल्याला मंत्र दिला तो. नंतर पुन: एकदोन मिनिटांनीं महाराजांनीं तोच उच्चार केला. तेव्हां त्या गृहस्थाची खात्री झाली, कीं, आपल्या गुरूनें आपल्याला जो मंत्र दिला होता, तोच जपण्यास आपल्याला महाराज सांगत आहेत.

एकदां ठाणें जिल्ह्यांतला एक गृहस्थ महाराजांच्या दर्शनास गेला असतां महाराजांनीं त्याला सांगितलें "मारुतीची पूजा करीत जा." महाराजांनीं अशी आज्ञा कां केली, हें त्याला कळेना मग तो वाडयांत गेल्यानंतर मंडळीनें त्याला विचारलें "तुम्ही मारुतीची पूजा करीत असतां काय?"

तो म्हणाला "होय, माझ्या घराजवळ पंचमुखी मारुतीचें देऊळ आहे. तेथें पूजा केल्याशिवाय मी अन्न ग्रहण करीत नसतों."

अर्थात् त्याची चालत आलेली उपासना महाराजांनी दृढ केली. महाराजांचा स्वतंत्र पंथ अथवा सांप्रदाय असा नाहीं. ज्याची जी उपासना असेल ती दृढ करावयाची. महाराजांकडे सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे लोक जात असत;पण कोणालाही पूर्वीची उपासना सोडून दुसऱ्या उपासनेला महाराजांनीं लावल्याचें उदाहरण आढळून येत नाहीं. मात्र कोणत्याही राजमार्गानें माणूस जात असतां जर तो त्या आपल्या मार्गापासून ढळला, तर पुन: त्याला त्याच्याच मूळ मार्गावर आणून त्याला पुढची वाट दाखवून द्यावयाची, असाच महाराजांचा क्रम आहे. महाराजांकडे योगाभ्यासी जातात, कर्माभ्यासी जातात, ज्ञानाभ्यासीही जातात, आणि सर्वांना महाराजांकडून आपापल्या अभ्यासांत उत्तम मदत होते, असा प्रत्येकाचा अनुभव आहे.

एकदां माझे एक स्नेही महाराजांच्या दर्शनाला गेले असतां पहिल्याच भेटीस महाराज त्यांना " या रामदास," असें म्हणाले. पुढें त्या स्नेह्याला मीं विचारलें " महाराजांनीं तुम्हाला अशा तऱ्हेनें कां हाक मारिली ?'

त्यांना पहिल्यांदा कांहीं कारण सुचेना. मग थोडया वेळानें एकाएकीं त्यांना कारण सुचलें. ते म्हणाले " अलीकडे दोन वर्षांपासून मीं मनांतल्या मनांत रामनामाचा जप करीत असतों; पण ही गोष्ट कोणालाच ठाऊक नाहीं. घरांतल्या मंडळीलासुद्धां ठाऊक नाहीं." अर्थातच महाराजांनीं दिलेली संज्ञा याच गोष्टीची दर्शक होती, यांत संशय नाहीं.

१९०९च्या नाताळांत एक डॅाक्टर आपल्या एका मामलेदार मित्राबरोबर शिर्डीस गेले होते. हे डॅाक्टर ब्राम्हण असून स्नानसंध्याशील आणि रामोपासक असल्यामुळें शिर्डिस जाण्यास नाखुष होते. ते ह्मणाले " मुसलमानाच्या पायां पडणें मला आवडत नाहीं, आणि ह्मणून मला यावेंसें वाटत नाहीं."

त्यावर मामलेदारांनीं त्यांना सांगितलें " पायां पडण्याबद्दल तुह्माला कोणीही आग्रह करणार नाहीं, आणि बाबाही तसें करा म्हणून म्हणणार नाहींत."

अशा तऱ्हेनें समजूत घातल्यामुळें डॅाक्टर शिर्डीस गेले. बाबांच्या मशिदींत जाऊन उभे राहिले, तों कोणी मुसलमान न दिसतां आपल्या पुढें श्रीरामाची मूर्ती आहे, असा त्यांना भास झाला. त्याबरोबर अर्थात् डॅाक्टरांनीं साष्टांग नमस्कार घातला. मशीदीबाहेर आल्याबरोबर त्यांनीं ही

हकीकत आपल्या मामलेदार मित्रास सांगितली. दुसरे दिवशीं डॉक्टरांनं निश्चय केला, कीं, महाराजानी आपल्यावर कृपा केल्याशिवाय जेवावयाचं नाहीं, आणि मशीदींतही जावयाचें नाही. त्याप्रमाणें ते तीन दिवस जेवलेही नाहींत, किंवा दर्शनालाही गेलें नाहींत. चौथ्या दिवशीं डॉक्टरांचे एक स्नेही खानदेशांतून अकस्मात् महाराजांच्या दर्शनाला आले. आठ नउ वर्षांनीं गांठ पडल्यामुळें डॉक्टरांना फार आनंद झाला, आणि त्या आनंदाच्या भरांत त्यांच्याबरोबर ते महाराजांच्या दर्शनाला गेले. डॉक्टरांनीं नमस्कार घातल्याबरोबर महाराज म्हणाले " कां डॅाक्टर, कशाला आलास ? तुला कोणी बोलाविलें होतें ?" अर्थात् डॉक्टरास आपल्या निश्चयाचें ( कृपा झाल्याशिवाय दर्शनाला जावयाचें नाहीं याचें ) स्मरण झालें. व ते विरघळून गेले. त्याच दिवशीं मध्य रात्रींच्या सुमारास डॉक्टरांवर कृपा झाली. झोंपेंत असतांना परमानंदाची स्थिति प्राप्त झाली. ही स्थिति पुढें पंधरावीस दिवस, डॉक्टर आपल्या गांवीं परत गेल्यावरहि टिकली.

ज्याची जी उपासना असेल तिची त्याला खूण द्यावयाची, आणि तीच दृढ करावयाची, असा जो महाराजांचा क्रम, याबद्दल आणखी पुष्कळ अनुभव सांगतां येण्यासारखे आहेत; पण विस्तारभयास्तव ते तेथें नमूद न करितां दुसऱ्या तऱ्हेच्या अनुभवाकडे वळतों.

एकदां माझे दोन स्नेही वाड्यांत रात्रीं इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बसले होते. मीही त्यांच्याजवळ होतों, पण मला झोंप लागली होती. ते दोघे रात्रीं सुमारें एक वाजेपर्यंत बसले होते. शेवटीं त्यांचें त्यांनांच वाटलें कीं. आपण करितों हें बरोबर नाहीं. आणि एकजण म्हणाला " चला निजूं या, लोकांच्या उखळ्यापाखाळ्या पुरे झाल्या ! "

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाबांच्या दर्शनाला बरीच मंडळी गेली, त्यांत हे गृहस्थही होते. ते पायां पडत असतांना महाराजांचे उद्गार निघाले, ते असे:- " आपल्या दरबारांस सर्व तऱ्हेचे लोक येतात. चांगलेही येतात वाईट, खट, नष्ट, दुष्ट. असेही येतात. आपण कशाला कोणाच्या उखाळ्यापाखाळ्या काढाव्या ! "

अर्थात् माझ्या स्नेह्याला ती खूण पटली, आणि या गोष्टीपासून धडा घ्यावयाचा तो त्यांनीं घेतला.

जे शक्ति उपजवी भक्ति । समर्थ साई चरणासक्ति ॥
संसारीं राहून संसार निवृत्ति । आनंद वृत्ति जे देई ॥ ८५ ॥
नाना प्रकारीं नाना मतीं । भक्तीचे प्रकार वहुत कथिती ॥
संक्षेपें तयांची लक्षण स्थिति । यथानिगुती कथीन ॥ ८६ ॥
स्वस्वरूपानुसंधान । हें एक भक्तीचें मुख्य लक्षण ॥
म्हणती वेदशास्त्रव्युत्पन्न । ज्ञानसंपन्न आचार्य ॥ ८७ ॥
पूजादिकीं प्रेमव्यक्ति । अर्चनभक्तीची हे रीती ॥
ऐशी पाराशर व्यासोक्ति । भक्ति म्हणती ती एक ॥ ८८ ॥
गुरु प्रीत्यर्थ उपवन । पारिजातादि पुष्पावचय जाण ॥
गोमय सडा संमार्जन । गुर्वंगण झाडावें ॥ ८९ ॥
प्रथम स्नान संध्या करणें । गुरु देवार्थ गंध उगाळणें ॥
पंचामृत स्नान घालणें । धूप दीपार्चनेसीं ॥ ९० ॥
तदुपरी नैवेद्य समर्पणें । आरती धूपारती करणें ॥
ऐसें जें सप्रेम घडणें । अर्चन नांव या सकळां ॥ ९१ ॥
अपुले हृदयींची चित्कला । शुद्ध बुद्ध स्वभाव निर्मला ॥
मूर्तींत आमंत्रून तिजला । अर्चनाला लागावें ॥ ९२ ॥
मग तें चित्कला मागुती । पूजनार्चन विसर्जनांतीं ॥
निजहृदयीं पूर्वस्थिति । अवस्थित करावी ॥ ९३ ॥
आतां अवांतर भक्तीचें लक्षण । गर्गाचार्य मतीं जाण ॥
मन होय गुणकीर्तनीं तल्लीन । होय विलीन हरिरंगीं ॥ ९४ ॥
अखंड आत्मानुसंधान । कथाकीर्तन विहिताचरण ॥
हें तों पुढील भक्ति जाण । शांडिल्यवचन हें ऐसें ॥ ९५ ॥

जयां मनीं साधावें स्वहित । ते तो आचरती वेदविहित ॥
कर्मनिषिद्ध आणि अविहित । टाळिती निजहित बाधक जें ॥ ९६ ॥
कोण्याही क्रियेचा वा फलाचा । कर्ता भोक्ता नाहीं मी साचा ॥
हा भाव उपजे जैं निरहंकृतीचा । ब्रह्मार्पणाचा तो योग ॥ ९७ ॥
ऐसिया रिती कर्म करितां । सहजी उपजे नैष्कर्म्यता ॥
कर्म कदापि नये त्यागितां । कर्म कर्तृता त्यागूं ये ॥ ९८ ॥
कांटयानें कांटा काढिल्यावीण । कर्म थांबेना कर्मावांचून ॥
हातीं लागतां निजात्मखूण । कर्म संपूर्ण राहील ॥ ९९ ॥
फलाशेचा पूर्ण विराम । काम्यत्यागाचें हेंच वर्म ॥
करणें नित्यनैमित्तिक कर्म । शुद्ध स्वधर्म या नांव ॥ १०० ॥
सर्वकर्म भगवंतीं अर्पण । क्षणैक विस्मरणें निर्विण्णमन ॥
ऐसें नारदीय भक्तीचें वर्णन । भिन्न[1]लक्षण भक्ति हे ॥ १०१॥
ऐशीं भक्तीची अनेक लक्षणें । एकाहून एक विलक्षणें ॥
आपण केवळ गुरुकथानुस्मरणें । कोरडया चरणें भवतरूं॥१०२॥
हा गुरुकथा श्रवण छंद । लागला मज झालों दंग ॥
स्वयेंही करावे कथाप्रबंध । अनुभव सिद्ध वाटलें ॥ १०३ ॥
पुढें एकदां शिरडीस असतां । दर्शनार्थ मशिदी जातां ॥
बाबांस देखिलें गहूं दळतां । अतिविस्मयता उदेली ॥ १०४॥
आधीं कथितों ती कथा । श्रवण करावी स्वस्थ चित्ता ॥
त्यांतून उद्भव या साईचरिता । झाला केउता मगपरिसा॥१०५॥
उत्तम श्लोकगुणानुवाद । तयाचा प्रेमकथासंवाद ॥
करितां होईल चित्त शुद्ध । बुद्धीही विशद होईल ॥ १०६ ॥

---

१ जिचीं लक्षणें भिन्न भिन्न आहेत अशी

पुण्यश्लोकगुणानुवर्णन । तत्कथा तल्लीलाश्रवण ॥
एणेंभगवत्परितोषण । क्लेशनिवारण त्रितापा ॥ १०७ ॥

अधिभूतादितापनिर्विण्ण । आत्महितेच्छू आत्मप्रवण ॥
आवडी तयांचे धरिती चरण । अनुभव संपन्न मग होती॥१०८॥

असो आतां दत्तचित्त। व्हाजी परिसा गोड वृत्तांत ॥
वाटेल बाबांचें आश्चर्य बहुत । कृपावंतत्व पाहूनी ॥ १०९ ॥

एके दिवशीं सकाळीं जाण । बाबा करोनी दंतधावन ॥
सारोनी मुखप्रक्षाळण । पांडू दळण आरंभिलें ॥ ११० ॥

हातीं घेतलें एक सूप । गेले गंव्हांचे पोत्यासमीप ॥
भरभरून मापावर माप । गहूं सूपांत काढिले ॥ १११ ॥

दुसरा रिकामा गोणं पसरिला । वरी जात्याचा ठाव घातला॥
खुंटा ठोकून घट्ट केला । व्हावा न ढीला दळतांना ॥११२॥

मग अस्तन्या सारूनि वरी । कफनीचा घोळ आवरी॥
बैसका देऊनि जात्याचे शेजारीं । पसरूनि पाय बैसले॥११४॥

महदाश्चर्य माझिये मना । दळणाची ही काय कल्पना ॥
अपरिग्रहा अकिंचना । हीकां विवंचना असावी ॥ ११४ ॥

असो खुंटा धरोनी हातीं । मान घालोनिया खालतीं ॥
बाबा निजहस्तें जातें ओढिती । वैरा रिचविती निःशंक॥११५॥

संत देखिले अनेक । परी दळणारा हाचि एक ॥
गहूं पिसण्याचें तें काय सुख । त्याचें कौतुक तो जाणे ॥११६॥

लोक पाहती साश्चर्य चित्ता। धीर न पुसाया हें काय करितां
गांवांत पसरितां हे वार्ता । पातल्या तत्वतां नरनारी ॥११७॥

धांवतां धांवतां बाया थकल्या । चौघी लगबगा मशिदी चढल्या ॥
जाऊनि बाबांचे हाता झोंबल्या ।खुंटा घेतला हिसकोनी॥११८॥
बाबा त्यांसवें भांडती । त्या एकसरा दळूं लागती ॥
दळतां बाबांच्या लीला वानिती । गीतें गाती बाबांचीं॥११९॥
पाहून बायांचे प्रेमाला । उसना राग ठायींच निवाला ॥
रागाचा तो अनुराग झाला । हंसूं गालांत लागले ॥१२०॥
दळण झालें पायलीचें । सूप रिकामें झालें साचें ॥
बायांचे मग तरंग मनाचे । लागले नाचूं अनिवार ॥ १२१॥
बाबा न स्वयें भाकर करिती । त्यांची तों प्रत्यक्ष भैक्ष्यवृत्ति॥
ते या पिठाचें काय करिती । बाया तर्किती मनांत ॥१२२॥
नाहीं बाईल नाहीं लेक । बाबा तों एकुलते एक ॥
घरदार ना संसार देख । कशास कणिक एवढी ॥१२३॥
एक ह्मणे बाबा परमकृपाळ । आह्मां प्रीत्यर्थ तयांचा खेळ ॥
आतां ही कणिक निखळ । देईल सकळ आह्मांतें ॥१२४॥
करितील आतां चार भाग । एकेकीचा एकेक विभाग ॥
ऐसे मनांत मांडे देख । त्या सकळीक भाजिती ॥१२५॥
बाबांचे खेळ बाबांस ठावे । कोणी न तयांचा अंत पावे ॥
परी बायांचे मनाचें उठावे । लोभें लुटावें बाबांना ॥१२६॥
पीठ पसरलें गोधूम सरले । जातेंभिंतीस टेकून ठेविलें ॥
सूपांत बायांनीं पीठ भरीलें। नेऊं आदरिलें घरोघर ॥१२७॥
तेथपर्यंत बाबा कांहीं । चकार शब्द वदले नाहीं ॥
भाग करितां चार चौघींहीं । वदती पाहीं मग कैसें ॥१२८॥

चळल्या कायकुडें नेतां । बापाचा मालघेऊनि जातां ॥
जा शिवेवरी नेऊन आतां । पीठ तत्वतां टाकातें ॥१२९॥

आल्या रांडा फुकट खाऊ । लुटाया मज धांव धावूं ॥
गहूं माझे काय कर्जाऊ । पीठ नेऊं पाहतां ॥१३०॥

बाया मनीं बहु चुरमुरल्या । लोभापायीं फजित पावल्या ॥
आपआपसांत कुजबुजूं लागल्या । तात्काळ गेल्या शिवेवरी।१३१

आरंभ बावांचा कोणाही नकळे । कारण प्रथमतः कांही ही नाकळे
धीर धरितां परिणामीं फळे । कौतुक आगळें बावांचें॥१३२॥

पुढें मग म्या लोकां पुसिलें । हें कां बावांनीं ऐसें केलें ॥
रोगराईस संपूर्ण घालविलें । जन वदले ऐसेंनी ॥ १३३ ॥

गोधूम नाहींती महामारी । भरडावया जात्यांत वैरी ॥
तो मग भरडा शिवेवरी । उपरा उपरी टाकवी ॥ १३४ ॥

पीठ टाकिलें ओढिया कांठीं । तेथून रोगास लागली ओहटी ॥
दुर्दिन गेले उटाउटी । हे हातोटी बावांची ॥ १३५ ॥

गांवांत होती मरीची सांथ । करीती हा तोडगा साईनाथ ॥
झाली रोगाची वाताहात । गांवास शांतत्व लाधलें ॥१३६॥

पाहोनि दळणाचा देखावा । कौतुक वाटलें माझिया जीवा ॥
कसा कार्यकारण भाव जुळवावा ।ताळा मिळवावा हा कैसा१३७

काय असावा हा अनुबंध । गव्हा रोगाचा काय संबंध ॥
पाहूनि अनवर्य कारण निर्बंध । वाटलें प्रबंध लिहावा ॥१३८॥

क्षीरसागरा याव्या लहरी । प्रेम उचंबळलें तसें अंतरीं ॥
वाटलें गावी ती पोटभरी । कथा माधुरी बावांची ॥१३९॥

हेमाड साईनाथासी शरण । संपलें तें मंगला चरण ॥
संपलें आप्तेष्टसंत नमन । सद्गुरुवंदन अखंड ॥ १४० ॥

पुढील अध्यायीं ग्रंथ प्रयोजन । अधिकारि अनुबंध दर्शन ॥
यथामति करीन कथन । श्रोतां स्वस्थ मन परिसीजें ॥१४१॥

तैसेंच श्रोत्यावक्त्याचें निजहित । ऐसें हें श्रीसाई सच्चरित ॥
रचिता हा कोण हेमाडपंत । होईल ही विदित पुढारा॥१४२॥

इति श्रीसंतसज्जनप्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थ सच्चरिते । मंगलाचरणंनाम प्रथमोध्यायः ॥

॥ श्री साई नाथार्पणमस्तु शुभंभवतु ॥



# अध्याय २ रा.

णेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥
श्री [illegible]वतायै नमः ॥ श्री सीतारामचंद्राभ्यां नमः ॥
श्री सद्गुरु साईनाथाय नमः ॥

पूर्वाध्यायीं मंगलाचरण । जाहलें देवताकुलगुरुवंदन ॥
साईचरित्रबीज पेरून । आतां प्रयोजन आरंभूं ॥ १ ॥
अधिकारी अनुबंध दिग्दर्शन । अति संकलित करूं विवेचन ॥
जेणें श्रोतयां ग्रंथ प्रवेशन । आयासेंवीण घडेल ॥ २ ॥
प्रथमाध्यायीं यथानुक्रम । करून गोधूम पेषणोपक्रम ॥
केला महामारीचा उपशम । आश्चर्य परम ग्रामस्थां ॥ ३ ॥
ऐशा साईच्या अगाध लीला । श्रवण करितां आनंद झाला ॥
तोच या काव्यरूपें प्रगटला । बाहेर उतटला प्रेमपूर ॥ ४ ॥
म्हणून साईचे धन्यवाद । वाटलें यथामती करावे विशद ॥
होतील ते भक्तांस बोधप्रद । पापापनोद होईल ॥ ५ ॥
तदर्थ हें साईचें चरित्र । लिहूं आदरिलें अति पवित्र ॥
आरंभिलें हें कथासत्र । इह परत्र सौख्यद ॥ ६ ॥
सन्मार्गदर्शक संतचरित्र । नव्हे तें न्याय वा तर्क शास्त्र
तरी होईल जो संतकृपापात्र । तया न विचित्र कांहींच ॥७॥

तरी ही प्रार्थना श्रोतयांलागीं । व्हावें जी या आनंदाविभागी
धन्य भाग्याचा तो सत्संगी ॥ कथा व्यासंगीं निरत जो ॥८॥

चिर परिचित जीवाचा मित्र । सहवास ज्याचा दिवस रात्र ॥
त्याचें न मज रेखाटवे चित्र । संतचरित्र काय लिहूं ॥ ९ ॥

जेथ माझें मज अंतरंग । ओळखूं येईना यथासांग ॥
त्या म्यां संता मनींचे तरंग । वर्णावे निर्व्यंग कैसेनी ॥१०॥

करूं जातां स्वरूपनिर्धार । मूकावले जेथ वेदही चार ।
त्या तुझ्या रूपाचा विचार । कळेल साचार मजकैसा ॥११॥

स्वयें आधीं संत व्हावें । मगसंतां यथार्थ जाणावें ॥
तेथ मी संतांस काय वानावें । हे मज ठावें आधींच ॥१२॥

सप्त सागरींचें पाणी । तयाचीही करवेल मापणी ॥
आकाशास घालवेल गवसणी । परी न आयणीं संतयेती॥१३॥

जाणें मनीं मी एक पामर । परी बाबांचा प्रताप अनिवार ।
पाहून उठे गावयाची लहर । तीही अनावर हों पाहे ॥१४॥

जय जयाजी साई राया । दीना दुबळ्यांचिया विसाविया ॥
अगाध न वर्णवे तुझी माया । करी कृपा या दासावर ॥ १५ ॥

लहाना तोंडीं मोठा घांस । तैसें हें होईल माझें साहस ॥
होऊं न देई माझा उपहास । वाटे हा इतिहास लिहावा ॥१६॥

संतचरित्रें जे जे लिहिती । तयांवरी भगवंताची प्रीति ॥
ऐसें महाराज ज्ञानेश्वर वदती । धरावी भीति मग मी कां ॥१७॥

माझियाही मनींही स्फूर्ति । चेतविती तीच भगवंतमूर्ति ॥
स्वयें जरी मी जड मूढमती । निजकार्यपूर्ति ती जाणे ॥ १८ ॥

भक्त जी जी सेवा कल्पिती । संत स्वयेंच करवून घेती ।
भक्त केवळ कारण निमित्तीं । सकळ स्फूर्ति संतांची ॥ १९ ॥

सारांश हा साई स्वयें करवी । निजचरित्र मज मूर्खा करवीं ।
तेणेंच या कथेची थोरवी । गौरवी जे आदरें ॥ २० ॥

साधुसंत अथवा श्रीहरि । कोणातेंही धरुनि निजकरीं ॥
आपुली कथा आपण करी । निजकर शिरीं ठेवुनी ॥ २१ ॥

जैसी शकें सतराशें साली । महीपतीस बुद्धि स्फुरली ॥
साधु संतांहीं सेवा घेतली । चरित्रें लिहिविलीं त्या करवीं ॥२२

तीच सेवा अठराशें साली । दास गणूच्या हस्तें घेतली ॥
पुढील संतचरित्रें लिहिविली । पावन झालीं सकळीकां ॥ २३ ॥

भक्त आणि संत विजय ग्रंथ । भक्त आणि संत लीलामृत ॥
हे चार जैसे महीपती रचित । दास गणूकृत दोन तसे ॥ २४ ॥

एकाचें नांव भक्तलीलामृत । दुजयाचें तें संतकथामृत ॥
उपलब्ध अर्वाचीन भक्त संत । उभय ग्रंथांत वर्णिले । २५ ॥

त्यांतील भक्तलीलामृतांत । श्रीसाईचें मधुर चरित ॥
आहे वर्णिलें अध्यायत्रयींत । श्रोतीं तें तेथ वाचावें ॥ २६ ॥

तैशीच गोड ज्ञानकथा । कथिती साइ एकाभक्ता ॥
ती वाचावी संतकथामृता । अध्याय सत्तावन पहा ॥ २७ ॥

शिवाय साईची अलौकिक लीला । रघुनाथ सावित्री भजनमाला
अनुभव पूर्वक निवदी जनाला । अभंग पदाला गाऊन ॥२८॥

यांतचि एक बाबांचें लेंकरूं । जें तृषित चकोरां अमृत करूं ॥
वर्षलें कथामृत प्रेम पडि भरू । श्रोतां तें सादरू सेवावें ॥ २९ ॥

दास गणूची स्फूट कविता । तीही अत्यंत रस भरिता ॥
आनंद देईल श्रोतयाचित्ता । लीला परिसतां बाबांची ॥ ३०॥

तैसेंच गुर्जर जनांकरितां । भक्त अमीदास भवानी मेथा ॥
यांनीं ही कांहीं चमत्कार कथा । अति प्रेमळता लिहिल्याती ।३१

शिवाय कांहीं सद्भक्त शिरोमणी । साई प्रभा हें नांव ठेवुनीं ॥
प्रसिद्ध करित पुण्यपट्टणी । कथा श्रेणी बाबांच्या ॥ ३२ ॥

ऐस ऐशिया कथा असतां । या ग्रंथाची काय आवश्यकता ॥
शंका येईल श्रोतया चित्ता । निराकरणता आकर्णिजे ॥ ३३ ॥

साईचरित्र महासागर ।अनंत अपार रत्नाकर ॥
मी टिटवी तो रिता करणार । घडणार हें कैसेंनी ॥ ३४ ॥

तैसें साईचें चरित्र गहन । अशक्य कधींही सांग वर्णन ॥
म्हणून करावें करवेल तें कथन । तेणेंच समाधान मानावें ॥ ३५॥

अपार साईच्या अपूर्व कथा । शांतिदायक भवद्वार्ता ॥
श्रोतियां देतील श्रवणोल्हासता । चित्तस्थिरता निजभक्तां ॥३६॥

कथा वदले परोपरीच्या । व्यावहारिक उपदेशाच्या ॥
तैशाच सर्वांच्या अनुभवाच्या । वर्माच्या निजकर्माच्या ॥३७॥

अपौरुषेय श्रुति विख्यात । जैशा असंख्य आख्यायिकाविश्रुत ॥
तैशाच बाबा मधुर अर्थभरित । कथा अपरिमित सांगत ॥ ३८ ॥

ऐकतां त्या सावधान । इतर सुखें तृणासमान ॥
विरोन जाय भूकतहान । समाधान अंतरीं ॥ ३९ ॥

कोणासव्हावी ब्रम्ह सायुज्यता । अष्टांगयोग प्रावीण्यता ।
समाधिसुख निर्भरता । होईल कथा परिसतां या ॥ ४० ॥

श्रव  ांचे कर्मपाश । तोडून टाकिती या कथा अशेष ॥
बुद्धीस देती सुप्रकाश । निर्विशेष सुख सकळां ॥ ४१ ॥
तेणें मज स्फुरली वासना । ऐशा सुसंग्राह्य कथा नाना ॥
ओवूनी करावें मालाग्रंथना । हीच उपासना चांगली ॥ ४२ ॥
कानीं पडतां चार अक्षरें । तात्काळ जीवाचें दुर्दिन ओसरे ॥
संपूर्ण कथा ऐकतां सादरें । भावार्थी उतरेल भवपार ॥ ४३ ॥
माझी करोनिया लेखणी । बाबाच गिरवितील माझा पाणी ॥
मी तो केवळ निमित्ताला धणी । अक्षरें वळणीं वळवितों ॥ ४४
वर्षानुवर्ष बाबांची लीला । पाहोनि लागला मनासी चाळा ॥
बाबांच्या गोष्टी कराव्या गोळा । भोळ्याभोळ्या प्रेमळा कारणें ॥ ४५ ॥
होऊनियां प्रत्यक्ष दर्शन । निवाले नाहींत ज्यांचे नयन ।
तयांस बाबांचें माहात्म्य श्रवण । पुण्य पावन घडावें ॥ ४६ ॥
कोणा सभाग्याचिया मना । वाचावयाची होईल कामना ।
परमानंद होईल मना ॥ समाधाना लाहेल ॥ ४७ ॥
ऐशी मनांत उदेली वृत्ति । माधवरावांचे कानावरतीं ॥
घातली परी साशंक चित्तीं । कैसें मजप्रति साधे हें ॥ ४८ ॥
वयास उलटलीं वर्षे साठ । बुद्धिही नाठ वाहे सुनाट ॥
अशक्तपणें राहील खटपट । उरली वटवट तोंडाची ॥ ४९ ॥
ती तरी व्हावी साईप्रीत्यर्थ । साधेल कांहींतरी परमार्थ ॥
इतरत्र होईल ती निरर्थ । एतदर्थ हा यत्न ॥ ५० ॥
अनुभव घेतां दिवस रात्री । वृत्तांत लिहाया आलें चित्तीं ॥
जयाच्या परिशीलनें शांति । मनास विश्रांति लाभेल ॥ ५१ ॥

आत्मतृप्तीचे निसर्गोद्गार। स्वानुभूतीचे अधिष्ठानावर ॥
बाबा उद्गारले वारंवार। श्रोतयां सादर करावे ॥ ५२ ॥
बहुत वदले ज्ञानकथा। अनेकां लाविलें भजनपंथा ॥
तयांचा संग्रह करावा पुरता। होईल गाथा साईचा ॥ ५३ ॥
त्या या कथा जे सांगती। सादर मनें जे जे ऐकती ॥
उभयांच्या मनास विश्रांति। पूर्ण शांति लाभेल ॥ ५४ ॥
ऐकतां श्रीमुखांच्या कथा। भक्त विसरतील देहव्यथा ॥
तयांचें ध्यान मनन करितां। भव निर्मुक्तता आपैसी ॥ ५५ ॥
श्रीसाईमुखींच्या वार्ता। अमृता परिस रस भरिता ॥
परमानंद दाटेल परिसतां। काय मधुरता वानूं मी ॥ ५६ ॥
ऐशिया कथा जो अदांभिकता। आढळेल मज गातां वर्णितां ॥
वाटे तया पदरज धुळी लोळतां। मोक्ष हाता येईल ॥ ५७ ॥
तयांच्या गोष्टींची अलौकिक मांडण। तैशीच शब्दा शब्दाची ठेवण
परिसतां तल्लीन श्रोतृगण। सुख संपूर्ण सकळिकां ॥ ५८ ॥
जैसे गोष्टी ऐकावया कान। किंवा दर्शन घ्यावया नयन ॥
तैसेंच मन होऊनियां उन्मन। सहज ध्यान लागावें ॥ ५९ ॥
गुरुमाउली माझी जननी। कथिती तियेच्या कथा ज्या जनीं ॥
ऐकिजेती वदनो वदनीं। सादर श्रवणीं साठवूं ॥ ६० ॥
त्या त्याच वारंवार आठवूं। साठवतील तितक्या साठवूं ॥
प्रेमबंधनीं त्या गांठवूं। मग लुटवूं परस्पर ॥ ६१ ॥
यांत माझें कांहींच नाहीं। साईनाथांचीच प्रेरणा ही ॥
तें जैसें वदवितील कांहीं। तैसें तें पाहीं मी वदें ॥ ६२ ॥

मी वदें हाही अहंकार । साईच स्वयें सूत्रधार ॥
तोच वाचेचा प्रवर्तविणार । तरी ते वदणार मी कोण ॥ ६३ ॥

मीपणा समर्पितां पायांवर । सौख्य लाधेल अपरंपार ॥
सकळ सुखाचा संसार । अहंकार गेलिया ॥ ६४ ॥

ही वृत्ति उठाया अवसर । बाबांस विचारूं नाहीं धीर ॥
आले माधवराव पायरीवर[1] । तयांचें कानावर घातली ॥ ६५ ॥

तेचवेळीं माधवरावांनीं । नाहीं तेथें दुसरे कोणी ॥
ऐसाच प्रसंग साधुनी । बाबा लागुनीं पुसियलें ॥ ६६ ॥

बाबा हे अण्णा[2] साहेब म्हणती । आपुलें चरित्र यथामती ॥
लिहावें ऐसें येतें चित्तीं । आपुली अनुमति असलिया ॥ ६७॥

मी तो केवळ भिकारी । फिरतों भिक्षेस दारोदारीं ॥
ओली कोरडी भाजी भाकरी । खाऊनी गुजारीं काळ मी ॥६८

त्या माझी कथा काशाला । कारण होइल उपहासाला ॥
ऐसें न म्हणाया हिरियाला । कोंदणीं जडविला पाहिजे ॥ ६९॥

असो आपुली अनुज्ञा काय । लिहितील आपण असल्या सहाय ॥
किंवा लिहिवितील आपुलेचपाय । दूर अपाय दवडुनी ॥ ७० ॥

असतां संतांचीं आशीर्वचनें । तैंच उपक्रम ग्रंथरचने ॥
विना आपुल्या कृपावलोकनें । निर्विघ्न लेखन चालेना ॥ ७१॥

जाणोनि माझिया मनोगता । कृपा उपजली साईसमर्था ॥
म्हणती लाहसील मनोरथा । पायीं म्यां माथा ठेविला ॥ ७२ ॥

---

१ मशीदींची पायरी. २ या साईचरित्राच्या लेखकास त्यांचे स्नेही बहुधा या नांवाने संबोधीतात.

दिधला मज उदीचा प्रसाद । मस्तकीं ठेविला हस्तवरद ॥
साईसकलधर्मविशारद । भवापनोदक भक्तांचा ॥ ७३ ॥
ऐकोनि माधवरावाची प्रार्थना । साईस आली माझी करुणा ॥
अधीर मनाच्या शांतवना । धैर्य प्रदाना आदरिलें ॥ ७४ ॥
भावार्थ जाणोनि माझे मनींचा । अनुज्ञापनीं प्रवर्तली वाचा ॥
'कथावार्तादि अनुभवांचा । संग्रह साचा करावा' ॥ ७५ ॥
दफ्तर ठेवा बरें आहे । त्याला माझें पूर्ण सहाये ॥
तो तर केवळ निमित्त पाहें । लिहावें माझें मीच कीं ॥ ७६ ॥
माझी कथा मीच करावी । भक्तेच्छा मीच पुरवावी ॥
तयानें अहंवृत्ति जिरवावी । निरवावी ती ममपदीं ॥ ७७ ॥
ऐसें वर्ते जो व्यवहारीं । तयासी पूर्ण साह्य करी ॥
हे कथाच काय सर्वतोपरी । तयाघरीं राबें मी ॥ ७८ ॥
अहंवृत्ति जेव्हां मुरे । तेव्हां तयाचा ठावही नुरे ॥
मीच मग मीपणें संचरें । माझ्याच करें लिहीन मी ॥ ७९ ॥
ये बुद्धि जें कर्म आरंभिलें । श्रवण मनन वा लेखन यहिलें ॥
ज्याचें त्यानेंच तें संपादिलें ॥ त्यास तों केलें निमित्त ॥ ८० ॥
अवश्यमेव दप्तर ठेवा । घरीं दारीं असा कुठें वा ॥
वारंवार आठव ठेवा । होईल विसाव जीवास ॥ ८१ ॥
करितां माझिया कथांचें श्रवण । तयांचें कीर्तन आणि चिंतन ॥
होईल मद्भक्तीचें जनन । अविद्या निरसन रोकडें ॥ ८२ ॥
जेथें भक्ती श्रद्धान्वित । तयाचा मी नित्यांकित ॥
ये अर्थी न व्हावें शंकित । इतरत्र अप्राप्त मी सदा ॥ ८३ ॥

सद्भावें या कथा परिसतां । निष्ठा उपजेल श्रोतयां चित्ता ॥
सहज स्वानुभव स्वानंदता । सुखावस्था लाधेल ॥ ८४ ॥

भक्तासीं निजरूपज्ञान । जीवा शीवा समाधान ॥
लक्षेल अलक्ष्य निर्गुण । चैतन्यघन प्रगटेल ॥ ८५ ॥

ऐसें या मत्कथांचें विंदान । याहून काय पाहिजे आन ॥
हेंच श्रुतीचें ध्येय संपूर्ण । भक्त संपन्न ये अर्थी ॥ ८६ ॥

जेथें वादावादीची बुद्धी । तेथें अविद्या माया समृद्धि ॥
नाहीं तेथें स्वहित शुद्धी । सदा दुर्बुद्धी कुतर्की ॥ ८७ ॥

तो न आत्मज्ञानास पात्र । तयास ग्रासी अज्ञान मात्र ॥
नाहीं तयास इहपरत्र । असुख सर्वत्र सर्वदा ॥ ८८ ॥

नको स्वपक्षस्थापन । नको परपक्षनिराकरण ॥
नको पक्षद्वयात्मक विवरण । कायें निष्कारण सायास ॥८०॥

"नको पक्षद्वयात्मक विवरण" । होतां या शब्दाचें स्मरण ॥
पूर्वी श्रोतयां दिधलें अभिवचन । जाहली आठवण तयाची ॥९०

मागां प्रथमाध्याय संपता । वचन दिधलेंसे कीं श्रोतां ॥
हेमाड नाम करण कथा । आधीं समस्तां सांगेन ॥ ९१ ॥

कथेमध्यें ही आडकथा । परिसतां ठरेल युक्तायुक्तता ॥
होईल जिज्ञासेची पूर्तता । ही ही प्रेरकता साईची ॥ ९२ ॥

पुढें मग पूर्वानुसंधान । होईल साई चरित्र निवेदन ॥
म्हणून श्रोतां करावें श्रवण । दत्तावधान ते कथा ॥ ९३ ॥

आतां हा साईलीला ग्रंथ । भक्त हेमाडपंत विरचित ॥
ऐसें जे प्रति अध्यायांतीं श्रुत । ते हे पंत कोण कीं ॥ ९४ ॥

सहज आशंका श्रोतयां मना । करावया तज्जिज्ञासा शमना ॥
कैसा आरंभ या नामकरणा । व्हावें त्या श्रवणा सादर ॥ ९५
जन्मादारभ्य मरणावधी । षोडश संस्कार देहासंबंधीं ॥
त्यांतील एक नामकरण विधी । संस्कार सिद्धी प्रसिद्ध ॥ ९६
तत्संबंधीं अल्प कथा । श्रोतां परिसीजे सादर चित्ता ॥
हेमाडपंत नामकरणता । प्रसंगोपात्तता प्रगटेल ॥ ९७ ॥
आधीं हा लेखक खटयाळ । जैसा खटयाळ तैसा वाचाळ ॥
तैसाच टवाळ आणि कुटाळ । नाहीं विटाळ ज्ञानाचा ॥ ९८ ॥
नाहीं ठावा सद्गुरु महिमा । कुबुद्धी आणि कुतर्कप्रतिमा ॥
सदा निज शाहाणीवेचा गरिमा । वादकर्मा प्रवृत्त ॥ ९९ ॥
परी भाक्तनरेषा सबळ । तेणेंच साईचे चरण कमळ ॥
दृष्टीस पडलें अदृष्टें केवळ । हा तो निश्चळ वादनिष्ठ ॥ १०० ॥
काका साहेब भक्त प्रवर नानासाहेब चांदोरकर ॥
यांसी ऋणानुबंध नसता जर । कोठून जाणार शिरडी हा १०१
काकासाहेब आग्रहा पडले । शिरडीचें जाणें निश्चित ठरलें ॥
जावयाचे दिवशींच बदललें । मन तें फिरलें अवचित ॥ १०२ ॥
याचा एक परम मित्र ॥ तो लब्धानुग्रह गुरुपुत्र ॥
असतां लोणावळ्यास सहकलत्र । प्रसंग विचित्र पातला१०३।
तयाचा एकुलताएक सुत । शरीरें सुदृढ गुणवंत ॥
असतां त्या शुद्ध हवेच्या स्थानांत । ज्वराक्रांत जाहला१०४।

१रा. रा. हरी सिताराम उर्फ भाऊसाहेब दीक्षित यांना साईबाबा काका म्हणून संबोधीत.

२ कै. रा. नारायण गोविंद चांदोरकर यांना साईबाबा नाना म्हणून संबोधीत.

[illegible]

[illegible] पुस्तक [illegible] आहे [illegible]

[illegible]

[illegible] आहे

[illegible]

[illegible] आहे

हरि सिताराम दीक्षित

पुस्तक मिळण्याचे ठिकाण — श्री [illegible]

रा. रा. गोविंद रघुनाथ दाभोलकर

[illegible] रोड [illegible]

[illegible]

[illegible]

# श्री साईनाथ भजनमाला.

सुधारून वाढविलेली आवृत्ति.

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाही. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रत फारच थोडया शिल्लक राहिल्या आहेत.

सावित्रीबाई तेंडुलकर.

माला मिळण्याचा पत्ता:—

श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,
रंगाऱ्याची चाळ
बांद्रे
बी. बी. सी. आय. रेल्वे.

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ४०२ ठाकुरद्वार, मुंबई येथें अनंत आत्माराम मोरमकर यांनी छापून रा. आ. तर्खड यांनी ५ टर्नर रोड बांद्रे येथें प्रसिद्ध केलें.